## यूनानी दार्शनिक

# डायोजनीजचा कंदील



फ्रेंकोइस केरेसिली

मराठी : अश्विनी बर्वे

यूनान मध्ये कुरीन्थ हे एक सुंदर शहर होते. तिथं डायोजनीज नावाचे एक तत्ववेत्ते राहत होते. ते खूप कमी साधनानिशी जीवन जगत होते.

त्यांच्यानुसार, ज्ञानाचे मूळ रहस्य – हे की लोकांनी आपल्या गरजा कमी कराव्यात. त्यांची एकमात्र संपत्ती म्हणजे नेसण्यासाठी एक जुनी पायघोळ कफनी आणि राहण्यासाठी एक अजब मातीचा ड्रम होय.

हे खरं आहे की कधीकाळी त्यांच्याकडे एक लाकडी कटोरा पण होता, पण एक दिवस त्यांनी एका मुलाला आपल्या ओंजळीने पाणी पितांना पाहिलं.

“तो मुलगा माझ्यापेक्षा जास्त समजदार आहे,” ते म्हणाले.

“त्याने मला दाखवले की फक्त दोन हातच पुरेसे आहेत.” मग त्यादिवसापासून डायोजनीजने आपला कटोरा कुठेतरी दूर फेकून दिला.

डायोजनीज, यांना सांसारिक गोष्टींपासून मुक्त व्हायचे होते.



तर मग, डायोजनीज जिवंत कसे राहत होते?

ते थंड पाणी पीत, आणि वाटसरू त्यांना ज्ञानाच्या बदल्यात जे काही छोटंमोठं खायला देत, ते ते खात.

ते काय करत?

बाजारात, डायोजनीज दगडाच्या मूर्तीसमोर आपला हात पसरट आणि तिच्याकडे नाण्याची भिक मागत असत.

लोकं विचारत, "डायोजनीज, तुम्ही असे का करतात?”

“ज्यामुळे तुमच्यासारख्या वेडपट, कठोर ह्दयी लोकांद्वारे झिडकारून घेण्याची मला सवय लागायला हवी” डायोजनीज त्यांच्यावर परत भुंकत.

कमीत कमी गोष्टींचा उपयोग करणे, आणि जे सत्य आहे ते भीडभाड न ठेवता बोलणे – डायोजनीजने आपल्या पूर्ण आयुष्यात हेच केलं.



डायोजनीज नेहमी इकडेतिकडे फिरत असत. अनेकदा मुलं त्यांच्याबरोबर असत.ते रस्त्यात किड्यांना फार लक्षपूर्वक बघत. डायोजनीज आपली तुलना एका कुत्र्याबरोबर करत..

“तुम्ही कुत्र्यासारखे कसे आहात, डायोजनीज?“ मुलं विचारत असत.

“मी कुत्र्याचा कुत्रा आहे! कुत्री तर फक्त शत्रूवर भुंकतात, पण मी आपल्या मित्रांवर सुद्धा भुंकतो.

तेव्हाच एक रागीट टकला माणूस आपले खांदे आवळत तिथून गेला.

डायोजनीजने त्यांची चेष्टा केली. “मी आपल्या केसांचे अभिनंदन करतो, त्यांनी तुमचे हास्यास्पद डोकं सोडून चांगलं केलं.”

डायोजनीज आपल्या आसपासच्या सगळ्या लोकांना हसवत असत. हसा आणि विचार करा - हाच त्यांचा सिद्धांत होता.



प्राचीन यूनान मध्ये, सगळ्या नागरिकांनी एकदम थिएटरमध्ये जाणे ही एक सामान्य गोष्ट होती.

जेव्हा नाटक संपे आणि लोक थिएटरमधून बाहेर येत असत, त्यावेळी डायोजनीज थिएटर मध्ये प्रवेश करत असत. मागून चालत जबरदस्तीने धक्का देत, गर्दीत आपल्यासाठी एक रस्ता तयार करत असत.

“तू वेडपट आहेस का, डायोजनीज! असं करणं बंद कर! तू काय करतो आहेस?” लोक त्याच्यावर ओरडत.

इथं जे लोक येत ते नम्र मेंढ्यासारखे येत, ते एक-दुसऱ्याच्या मागे-मागे चालत. ते स्वतः कधी विचार करत नसत. याच्याउलट स्वाभिमानी लोक त्यांना जे वाटे ते करत, ते दुसऱ्याची नक्कल करत नसत.



शहरात इतर तत्ववेत्ते सतत एकत्रित झालेल्या गर्दी समोर भाषण देत असत.

“मी तुम्हांला सांगतो मित्र असेच असतात....”

“मी तुम्हांला सांगतो,दोस्त असेच असतात...”

डायोजनीजला त्यांच्या भाषणात फक्त गरम हवा दिसे. डायोजनीज मानत की प्रत्येक माणूस सक्षम असतो. जर ते वस्तूंच्या बाबत त्यांनी विचार केला आणि समजून घेतले. डायोजनीजच्या नुसार जीवनाचा उद्देश धन-दौलत कमावून श्रीमंत होणं नव्हतं. लोकांनी आपल्या जीवनात ज्ञानाचा शोध घ्यायला हवा.



मग डायोजनीजने अन्य तत्ववेत्त्यांना एक शिकवण देण्याचे ठरवले.

दिवसा उजेडी, शहरातल्या सगळ्यात व्यग्र गल्लीत, तो आपल्या हातात कंदिल घेवून गर्दीत घुसला.

डायोजनीजला बघून इतर तत्ववेत्ते चकित झाले.

“तू काय करतो आहेस, डायोजनीज?"

“मी माणूस शोधत आहे!”

“तू नेहमीसारखा वेडपटपणा करत आहे डायोजनीज. सगळीकडे माणसंच माणसं आहेत.”

“ओह, तुम्ही स्वतः म्हटलं होतं की लोक आहेत पण कोणी मनुष्य नाही. तुम्हांला सूर्य असूनही एका कंदिलाची गरज भासली, ते बघण्यासाठी जे प्रत्येक छोट्या मुलाला माहित आहे.



मैसेडोनियाचे राजा महान सिकंदर , आपल्या काळातील सगळ्यात मोठे सेनापती होते. ज्यांनी अनेक युद्धात जय मिळवला होता आणि अथांग जमिनीवर विजय प्राप्त केला होता.

त्यांनी आपला प्रिय काळा घोडा, बुक्फालसवर स्वार होत एका नंतर एक युद्ध जिंकले होते.

पण सिकंदर एक विचार करणारा माणूस होता, तो नेहमी विवेकाचा शोध घेत. त्यांनी डायोजनीजची प्रशंसा केली, कारण त्याला जिवंत राहण्यासाठी कोणत्याही वस्तूची गरज नव्हती.

जेव्हा ते कुरिन्थ शहराच्या जवळ पोहचले, तेव्हा सिकंदरने डायोजनीजला भेटण्याचे ठरवले. डायोजनीज उन्हात स्वप्नं बघत होते.



सुवर्ण कवचाने सजलेला सिकंदर, डायोजनीजच्या जवळ पोहचला. सिकंदरची खूप मोठी लांब सावली पडली होती. जेव्हा तो थांबला तेव्हा त्याची सावली डायोजनीज वर पड़ली.

पण साधु डायोजनीज आपल्या जागेवरून हलला नाही. तुम्हांला वाटेल की कदाचित त्याने सिकंदरला बघितले नसेल.

सिकंदर त्याच्याशी बोलला.

“तुला हवं ते माग, डायोजनीज. मी तुझी प्रत्येक इच्छा पूर्ण करेन.”

डायोजनीजने सिकंदरकडे बघितले. मग त्याने सरळ सांगितले:

"महाराज, कृपया माझ्या सूर्याच्या उन्हापासून बाजूला व्हा.”

डायोजनीजला न प्रसिद्धी हवी होती आणि न पैसा

डायोजनीज एकदम फाटका आणि स्वतंत्र होता.



# डायोजनीजचा कंदील

यूनानी तत्ववेत्ता डायोजनीज निश्चित आपल्याला हसवेल - आणि आपल्याला तो विचार करायला भाग पाडेल. तो आपले जुने कपडे आणि मातीचा ड्रम घेवून प्रत्येक ठिकाणी का फिरतो? मुलांना सोडून तो प्रत्येकावर हसतो. दिवसाढवळ्या तो कंदीलाचा उपयोग करून बाकी तत्ववेत्त्याना चुकीचे ठरवतो. डायोजनीज, शक्तिशाली राजा, महान सिकंदरला सुद्धा एक महत्वपूर्ण शिकवण देतो.